एकात्मिक फलोत्पादन विकास
योजना

ठिबक सिंचन योजनाद्वारे फलोत्पादन
वाढ करण्याबाबत केन्द्र पुरस्कृत
योजना सन १९९२-९३.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्र. एजीआर-११९२/सीआर-१२/९२/का.४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२.
दिनांक : १० फेब्रुवारी, १९९३.

वाचा : १] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक-एजीआर-२१९२/
सीआर-१२/९२/का.४, दिनांक २५ मार्च, १९९२.
२] शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. एसबीआर-११९२/१६६/
सीआर-२/२-अे, दिनांक ३० जुलै, १९९२.
३] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. टिएसपी-१०९२/
बीयुडी/५०/९२/का.७, दि. २९.१२.१९९२.

2913
III

शासन निर्णय :- उपरोक्त अनुक्रमांक-१ मधील शासन निर्णयान्वये ठिबक सिंचन योजनेद्वारे फलोत्पादन वाढ करणे या योजनेस मंजूरी देण्यांत आली असून ही योजना ब सन १९९२-९३ मध्ये सुध्दा चालू ठेवण्यांत आली आहे. या योजनेसाठी चालू वर्षी लागणारी रु. १५.०० लाख ही रक्कम अर्थसंकल्पात समाविष्ट करण्या-साठी गेल्याहिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीत सादर करण्यांत आली होती. महाराष्ट्र पुरवणी विनियोजन अधिनियम-१९९२ [अधिनियम क्र. १९] पारित झाला असल्याने ही योजना सन १९९२-९३ या वर्षात आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींकरिता राबविण्यासाठी लागणाऱ्या एकूण रु. १५.०० लाख इतक्या खर्चास [आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी रु. ५.०० लाख व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनेसाठी रु. १०.०० लाख] मंजूरी देत आहे. ही तरतूद संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या अधिनस्त ठेवण्याबाबतचे आदेश उपरोक्त अनु.क्र. ३ येथील आदेशान्वये निर्गमित करण्यांत आले आहेत.

२. वरील बाबीवर होणारा खर्च आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी मागणी क्र. टी-७ लेखाशिर्ष "२४०१-पीक संवर्धन-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-१०७-रोप संरक्षण [२] ठिबक सिंचन पध्दती-अर्थसहाय्य [बी] केन्द्र पुरस्कृत [२००८] [२४०१ १०२३]" तर आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील मागणी क्र. टी-७, योजनांतर्गत २४०१-पीक संवर्धन-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना-१०७-रोप संरक्षण [२] ठिबक सिंचन पध्दती अर्थसहाय्य

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
26 MAR 1993
२६०७

. . . २/-

[बी] केन्द्र पुरस्कृत [१००%]" या लेखाशिर्षाखाली टाकावा व त्या लेखाशिर्षाखालील अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागवावा.

संचालक, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरहू योजनेची अमलबजावणी त्वरेने करावी व वरील तरतूदी पूर्णपणे खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ जी. के. राऊत ]
कक्ष अधिकारी.

प्रति